# राष्ट्रीय आरोग्य अभियान,जालना

## // उमेदवारांसाठी जाहिर सुचना//

राष्ट्रीय आरोग्य अभियान, जालना १५ वा वित्त आयोग अंतर्गत निव्वळ कंत्राटी तत्वावर वैद्यकिय अधिकारी (MBBS), स्टाफ नर्स (Staff Nurse Male & Female), प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Lab Technician) व बहुउद्देशीय आरोग्य सेवक (MPW Male) पदांकरिता अर्ज मागविण्यात आले होते.

त्यामध्ये बहुउद्देशीय आरोग्य सेवक (MPW Male) या पदांसाठी जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता (12th Science+ Paramedical Basic Training Course or Sanitary Inspector Course) असे नमुद होते मात्र सदर पदाच्या शैक्षणिक अर्हतेबाबत राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई दिनांक ०५ जुलै २०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांबाबत "विज्ञान शाखेतुन उच्च माध्यमिक शालांत परिक्षा किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य घोषित केलेली इतर कोणतेही परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे, आणि विभागाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपुर यांच्याकडुन आरोग्य कर्मचारी पदांसाठी निश्चित केलेला निमवैद्यकिय मुलभुत प्रशिक्षण अभ्यास क्रम किंवा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (Sanitary Inspector) किंवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (Sanitary Inspector) किंवा समकक्ष अभ्यासक्रम पुर्ण करुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे असे नमुद असल्याने जाहिरातीतील शैक्षणिक अर्हतेत अशंतः बदल (या शुध्दीपत्रकान्वये) करण्यात येत आहे".

उपरोक्त सर्व पदांकरिता अर्जाची छाननी करण्यात येवुन प्राप्त अर्जानुसार उमेदवारांची प्राथमिक पात्र व अपात्र यादी सोबत जोडण्यात येत आहे, त्यानुसार उमेदवारांना काही आक्षेप/हरकती असल्यास अशा उमेदवारांनी पुराव्यानिशी राष्ट्रीय आरोग्य

अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, जालना यांच्या आवक शाखेस दिनांक ०७/१०/२०२२ पर्यंत दुपारी ३:०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळुन) सादर करावेत. तसेच त्यानंतर आलेल्या उमेदवारांचे हरकती/आक्षेप अर्ज हे विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

तसेच पात्र व अपात्र उमेदवारांची सविस्तर माहिती www.jalna.gov.in & www.zpjalna.co.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे, कृपया पात्र व अपात्र उमेदवारांनी सदरील संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन आपली भरण्यात आलेली माहितीची खात्री करुन घेण्यात यावी.

-स्वाक्षरीत-
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद जालना